**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**गुरुवार दिनांक २५ जून २०२६**

**ठळक बातम्या....**

**1. नागपूरचे डॉ . बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ जीएमआर एरो कंपनीला औपचारीकरीत्या हस्तांतरीत**

**2. महाराष्ट्रात गौणखनिज आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची महसूल मंत्र्यांची घोषणा**

**3. नागपूर जिल्ह्यातील काटोल इथं दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी जागा-हस्तांतरणास राज्य शासनाची मंजुरी**

**4. स्मार्ट मीटर योजना रद्द करण्याच्या मागणीसाठी आज नागपुरात विदर्भ राज्य आंदोलन समिती आणि काँग्रेस पक्षाच्या वतीनं निषेध मोर्चा**

**आता सविस्तर बातम्या**

---------------------------------------

**जीएमआर हस्तांतरण**

विमान वाहतूक क्षेत्राच्या माध्यमातून विदर्भातील औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील निर्यातीला सक्षम करण्यासाठी नागपूरचे डॉ . बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ जीएमआर एरो कंपनीला हस्तांतरीत करण्यात आले. ‘नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रवासी क्षमता गेल्या १० वर्षांमध्ये जवळपास १० लाखांनी वाढली असून नवीन कंपनीकडे हस्तांतरण केल्यामुळे ही प्रवासी क्षमता दरवर्षी ६० लाखाहून अधिक वाढेल. एमआरओ, कार्गो हबच्या माध्यमातून हे विमानतळ आपल्या पूर्ण आर्थिक क्षमतेने विकसित होऊन 'एरोट्रोपोलिस' म्हणून नागपूर शहर उदयास येईल, असा विश्वास यावेळी केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनी व्यक्त केला.

***(होल्ड बाईट - केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू - ४० सेकंद)***

नागपुरात आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या निर्माणातील हा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा असून यामुळे प्रवासी वाहतुकी सोबतच विदर्भातील पर्यटन आणि खाणकाम क्षेत्राच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण तयार होईल असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी केलं. तर हे विमानतळ केवळ नागपूरच नव्हे तर संपूर्ण विदर्भ आणि मध्य भारताचे ग्रोथ इंजिन ठरेल, असा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

---

विधी मंडळ

राज्यात गौणखनिज माफिया आणि वाळू तस्करी रोखण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापन करण्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. गडचिरोली जिल्ह्यात नायब तहसीलदारावर झालेल्या हल्ल्या संदर्भातल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते. राज्यात गेल्या पाच वर्षांत दस्त नोंदवण्यासाठी मुद्रांकशुल्क निश्चिती करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांची तपासणी महालेखापरीक्षकांमार्फत करण्याची घोषणाही महसूल मंत्र्यांनी केली. दस्त नोंदणी करण्यासाठी मुद्रांक शुल्क निश्चित करण्याचे अधिकार असणाऱ्यांनी मुद्रांक शुल्क निश्चित करताना संबंधित कायद्याचं उल्लंघन करून ते मनमानी पद्धतीने कमी जास्त केल्याच्या तक्रारी आहेत यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे असं बावनकुळे म्हणाले.पुण्यात लोहगड किल्ल्यावर झालेल्या तरुणाच्या हत्येप्रकरणी SIT नेमण्याचे आदेश विधानसभा तालिका अध्यक्ष राजीव खरे यांनी राज्य सरकारला दिले आहेत. मावळचे आमदार सुनील शेळके यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.२०२३-२४ मधे राज्यभरात जंगलाला आग लागल्याच्या ५ हजार शंभर घटना घडल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी आज सभागृहात दिली. यात ११ हजार ५८० हेक्टर वनजमिनीवर नुकसान झालं असं त्यांनी सांगितलं. यातल्या ७ हजार ४२ घटना एकट्या गडचिरोली जिल्ह्यातल्या आहेत.

---

अमरावती अभ्यासिका

अमरावतीतील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी भाडेतत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेच्या करारातील अनियमिततेचा मुद्दा विधानसभेत गाजला. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणात सरकारला धारेवर धरत वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाईची मागणी केली. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी अनियमितता झाल्याचे मान्य करत संबंधित वसतिगृहाचे तत्कालीन प्रभारी गृह प्रमुखांना निलंबित करण्यात आल्याची माहिती दिली. या प्रकरणाची चौकशी सुरू असून दोषी आढळणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं. तसच संबंधित भाडेकरार रद्द करण्यात आला असून कोणतेही भाडे अदा करण्यात आलेले नसल्याचही स्पष्ट केल.

---

दिवाणी न्यायालय काटोल

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथील दिवाणी न्यायालयाच्या नवीन इमारतीसाठी आवश्यक जागा हस्तांतरणास महसूल विभागाने मंजुरी दिली आहे. नगर परिषद, काटोलच्या मालकीची १२,४०० चौरस मीटर जागा आणि न्यायालयाच्या ताब्यातील २,९०० चौ. मी. जागेची अदलाबदल करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे न्यायालयाच्या आधुनिक आणि प्रशस्त इमारतीच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

---------------------------------------

शमा मोहम्मद

काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉक्टर शमा मोहम्मद यांनी आज देशाच्या शिक्षण व्यवस्थेविषयी चिंता व्यक्त करण्यासाठी नागपुरात पत्र परिषद घेतली. नुकत्याच नीट परीक्षेबाबत घडलेल्या चुका आणि त्याचा विद्‍यार्थ्यांच्या आयुष्यावर झालेला विपरीत परिणाम, तसेच विद्‍यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या याविषयी गंभीर प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केले. यावेळी नागपूरचे जिल्हा अध्यक्ष प्रफुल गुडधे पाटील देखील उपस्थित होते.

---------------------------------------

डिजिटल अटक

डिजिटल अटक या सायबर गुन्हे प्रकाराच्या २०० हून अधिक प्रकरणात तपास करताना सीबीआय अर्थात केंद्रीय गुप्तचर संस्थेनं महाराष्ट्र, गुजरात, पंजाब आणि दिल्लीसह १६ राज्यांमधल्या ८० पेक्षा जास्त ठिकाणांवर छापे टाकले. तसंच, चेन्नई आणि कोलकाता इथून दोन जणांना अटक केली आहे. देशभरात डिजिटल अटक घोटाळ्याच्या २०० पेक्षा जास्त प्रकरणांमध्ये सहभाग असलेल्या गुन्हेगारी जाळ्याविरुद्ध ऑपरेशन चक्र ६ अंतर्गत सीबीआय तपास करत आहे. अटक करण्यात आलेले आरोपी शेल कंपन्या स्थापन करून बनावट बँक खाती तयार करत होते. सायबर अटकेतून मिळालेली रक्कम या खात्यांमध्ये वळवण्यात येत होती.

---------------------------------------

निषेध मोर्चा

स्मार्ट मीटर योजना रद्द करण्याच्या मागणीसाठी आज नागपुरात विदर्भ राज्य आंदोलन समिती आणि काँग्रेस पक्ष यांच्या संयुक्त विद्‍यमाने भव्य निषेध मोर्चाचं आयोजन करण्यात आलं. या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते तसेच वीज ग्राहक सहभागी झाले होते. स्मार्ट मीटर प्रणालीला विरोध दर्शवत आंदोलकांनी सरकारने ही योजना तातडीने मागे घ्यावी, अशी मागणी केली. सदर इथल्या मंगलवारी बाजारातून मोर्चाला सुरुवात झाली आणि विद्‍युत भवन इथं मोर्चा संपला. स्मार्ट मीटरमुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता

असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. विद्‌यमान डिजिटल मीटर बदलून जनतेवर अनावश्यक आर्थिक बोजा टाकला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. स्मार्ट मीटर योजना रद्‌द करण्याबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला.

---------------------------------------

विशेष लोक अदालत

भंडारा जिल्हा न्यायालय आणि  जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने १८ जुलै रोजी विशेष लोक अदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अंतर्गत दाखल धनादेश अनादराच्या प्रकरणांवर विशेष भर दिला जाणार आहे. दहा लाख रुपयांपर्यंतच्या धनादेशाशी संबंधित प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी ही संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित पक्षकारांनी या लोक अदालतीचा लाभ घेऊन वाद सामोपचाराने मिटवावेत, असं आवाहन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

सखोल पुनरीक्षण मोहीम

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत नागपूर जिल्ह्यात २० जूनपासून मतदार यादी अद्‌ययावत करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ३० जून ते २९ जुलैदरम्यान बीएलओ घराघरांत जाऊन इन्युमरेशन फॉर्मचे वितरण करतील. मतदारांनी जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, पालकांची माहिती तसेच विवाहित असल्यास पती/पत्नीचे नाव आणि  मतदार ओळखपत्र क्रमांक नमूद करून स्वाक्षरीसह फॉर्म जमा करावा, असं आवाहन जिल्हा प्रशासनाने केलं आहे.

---------------------------------------

नागपूर-मिरज रेल्वेगाडी

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने नागपूर-मिरज-नागपूर विशेष आरक्षित रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक 01205 ही विशेष रेल्वे 23 आणि  24 जुलै रोजी नागपूरहून सकाळी 8 वाजून 50 मिनिटांनी सुटणार असून दुसऱ्या दिवशी मिरज इथं पोहोचेल. तर गाडी क्रमांक 01206 ही विशेष रेल्वे 25 आणि  26 जुलै रोजी मिरजहून दुपारी 12.55 ला  सुटून दुसऱ्या दिवशी नागपूरला येईल. या गाडीला पंढरपूरसह वर्धा, अकोला, भुसावळ, मनमाड, अहमदनगर आणि दौंड आदी महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. विशेष गाडीत 18 डब्यांची व्यवस्था असून एकूण चार फेऱ्या चालविण्यात येणार आहेत.

--------------------------------------

आकाशवाणी सल्लागार समितीची बैठक

आकाशवाणी नागपूरच्या कृषी आणि गृह विभागाच्या त्रैमासिक सल्लागार समितीची बैठक काल  कार्यक्रम प्रमुख डॉ. विजयसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. शासकीय योजनांची माहिती आकाशवाणीच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी सहकार्य करावे, असं आवाहन त्यांनी केलं. कार्यक्रम अधिकारी सचिन लाडोळे यांनी जुलै-सप्टेंबर 2026 या कालावधीतील कृषी व गृह विभागाच्या कार्यक्रमांचे नियोजन सादर केले.

--------------------------------------

हवामान

हवामान विभागाने जारी केलेल्या सूचनेनुसार आगामी काही तासात गोंदिया, अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि नागपूर जिल्ह्यांतील काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांची शक्यता वर्तविली आहे. तसेच ताशी 30 ते 40 किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची आणि हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दरम्यान मागील २४ तासांत नागपूर जिल्ह्यात झालेल्या पावसात सावनेर इथं सर्वाधिक  ४३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.  बुलढाणा जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरु असून आज दुपारच्या सुमारास देखील  खामगाव तालुक्यातील काळेगाव, कंचनपुर बोरी अडगावसह परिसरात जोरदार पाऊस झाला.  बुलढाणा जिल्ह्यातील 13 तालुक्यांमध्ये एकूण 431 पूर्णांक  5 मिमी पाऊस पडला असून हंगामातील एकूण सरासरी पर्जन्यमान 255 पूर्णांक 3 मिमीवर पोहोचले आहे.

--------------------------------------